## Newspaper: Maharashtra Times

## Article date: 2nd June, 2020

## Article regarding winners of the 52nd Youth Festival

R. A. Podar College of Commerce and Economics has won the Overall Championship Trophy by 56 points at the 52nd Youth Festival conducted by Mumbai University. Our College also won the Overall Dance Trophy and Overall Music Trophy.

# पोदारशिवाय आहेच कोण!

**यूथ फेस्टमध्ये सलग पाचव्यांदा ओव्हरऑल चॅम्पियनशीपचा मान**

**मुंबई विद्यापीठाच्या यूथ फेस्टिव्हलमध्ये यंदा सलग पाचव्यांदा ओव्हरऑल चॅम्पियनशिपचा मान पोदार कॉलेजनं पटकावला. त्याबरोबरच कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक पातळीवरही अनेक बक्षीसं मिळवत आपण चॅम्पियन असल्याचं दाखवून दिलं.**

कार्तिक जाधव, कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com



अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या यूथ फेस्टिव्हलमधील गेल्या वर्षीच्या स्पर्धांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. २०१९-२० या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात स्पर्धांमध्ये अनेक कॉलेजांनी चमकदार कामगिरी केली. पण, माटुंग्याच्या पोदार कॉलेजनं दमदार कामगिरी करत सलग पाचव्यांदा ओव्हरऑल चॅम्पियनशिपच्या ट्रॉफीचा मान पटकावला. त्याबरोबरच वैयक्तिक पातळीवरदेखील कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी अनेक पारितोषिकं पटकावली.

पोदार कॉलेजच्या यूथमधील सलग पाचव्या विजयामुळे सलग दुसऱ्यांदा हॅटट्रिक करण्याच्या दिशेनं त्यांची वाटचाल होत आहे. संगीत आणि नृत्य विभागाची ट्रॉफी देखील पोदारनं आपल्याकडेच राखली. नृत्याच्या लोककला आणि सांस्कृतिक अशा दोन्ही प्रकारांत कॉलेजनं सुवर्णपदक पटकावलं आहे. तसंच संगीतातील इंडियन ग्रुप सॉंग, लाईट वोकल, नाट्यसंगीत यातदेखील सुवर्णपदकाची कमाई केली. या व्यतिरिक्त तन्वी देशपांडे या विद्यार्थिनीनं 'मिस युनिव्हर्सिटी'मध्ये पहिला क्रमांक, तर निशांत शिंदे या विद्यार्थ्यानं 'मिस्टर युनिव्हर्सिटी'मध्ये दुसरा क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धांसाठी प्राध्यापकांपासून ते प्रिन्सिपल यांच्यापर्यंत सगळे जण विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करत असतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर त्यांच्यातील कलागुणदेखील जपले जावे याकडे कॉलेजचं विशेष लक्ष असतं, असं विद्यार्थी सांगतात.



पोदार कॉलेजचे विद्यार्थी सर्वच क्षेत्रात कॉलेजचं नाव उंचावत असतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यावर कॉलेजचा भर असतो. कॉलेज त्यासाठी त्यांना वेळोवेळी प्रोत्साहही देत असतं. हे यश केवळ विद्यार्थी किंवा कॉलेजचं नसून, विद्यार्थ्यांच्या पालकांचंदेखील आहे. 'मुंबई टाइम्स'कडून याची नेहमी दखल घेतली जाते तेव्हा आणखी हुरुप येतो.

डॉ. शोबना वासुदेवन, प्रिन्सिपल,
पोदार कॉलेज

माजी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनामुळे स्पर्धकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळत असतं. विद्यार्थ्यांची मेहनत, माजी विद्यार्थ्यांचं मार्गदर्शन आणि कॉलेजचं प्रोत्साहन यामुळे हे यश मिळवता आल्याची भावना कॉलेजचे स्पर्धक व्यक्त करत आहेत.

**२०२०-२१साठी तयारी सुरू**

कॉलेज या वर्षी कधी सुरू होईल याबद्दल अद्याप अनिश्चितता आहे. पोदारच्या विद्यार्थ्यांनी मात्र स्पर्धेसाठी कसून तयारी करण्याचा चंग बांधला आहे. अर्थात, प्रत्येक विद्यार्थी आपापल्या घरून ही तयारी करणार आहे. व्हिडीओ कॉल, सोशल मीडिया, युट्यूबच्या माध्यमातून यासाठी तयारी केली जाईल. त्याबरोबरच अभ्यासाकडे दुर्लक्ष होणार नाही याची खबरदारीदेखील घेतली जाणार आहे.

युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीत बाजी मारणाऱ्या इतर कॉलेजांविषयी...३